**नि.दि.दा.क्र. ७३/२०२३**

**निशाणी २५ लगत**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा उलतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे वकिल श्री. एम.पी.पडोळे**

०४. मी अशिक्षीत आहे. प्रतिवादी हा माझा भाचा आहे व वादी हा मेव्हणा आहे. वाटपाची तारीख मला सांगता येणार नाही, परंतु त्याला दहा ते अकरा वर्ष झाली आहेत. वाटणी झालेल्या घराचा क्रमांक मला सांगता येणार नाही. वादी हे पाच भाउ व दोन बहिण आहे. तिन भाउ व एक बहिण मयत पावले आहेत. वाटपावेळी भावांमध्ये वाटण्या झालेल्या होत्या व बहिणींना बोलवीले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दावामिळकतीमध्ये बहिणींनी हिस्सा सोडुन न दिल्यामुळे त्यांचा त्यामध्ये हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांना वडीलोपार्जीत ४० ते ४५ एकर जमीन आहे.

०५. आजरोजी वादी यांचे वडील व प्रतिवादी यांचे आजोबा यांच्या नावे जवळगा शिवारात गट क्र. ४८ मध्ये एक एकर जमीन आहे, याबाबत मला माहित नाही. सदर जमीन आजोबांच्या नावाने असुन त्यांच्या निधनानंतर वारसांचा फेर ओढला नाही, याबाबत मला माहित नाही. वाटण्या झाल्या तेव्हा गावातील नागोराव खटाळ व सोपान चिद्रे हे पंच होते. जागा ही ७० किंवा ८० बाय ७० किंवा ८० अशी आहे. दक्षीण उत्तर १५ बाय ७५ अश्या पाच वाटण्या करण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, वाटण्या झाल्या नाहीत, त्यामुळे त्याचे वर्णन मी पुराव्याच्या शपथपत्रामध्ये केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्ष वाटण्या झाल्या नाहीत त्यामुळे कोणत्या दिशेला कोणता भाउ बसला हे माझया पुराव्याच्या शपथपत्रामध्ये नमुद केले नाही.

०६. आजरोजी दावामिळकतीचा ८अ उतारा सामाईक आहे, याबाबत मला माहित नाही. वाटणी झालेल्या कागदाप्रमाणे ताबा देण्यात आला होता व तो कागद हा प्रतिवादीकडे आहे आणी त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशी

कोणतीही वाटणी झाली नाही व मी प्रतिवादीच्या विरुदध साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझया पुराव्याच्या शपथपत्रामध्ये काय नमुद केले आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलतपास संपला

फेरतपास नाही...

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत्ती

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2026.08.17 16:24:26 +0530

रेणापुर

(ज्ञा.म.गित्ते)

दिनांक १७/०८/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

रेणापुर

**नि.दि.दा.क्र. ७३/२०२३**
**निशाणी २४ लगत**

**वादितर्फे साक्षीदार क्र. १ चा पुढील सरतपास शपथेवर सुरु वकिल श्री. आर.बी.होळकर**

१०. मी ४ सोबत काही दस्त दाखल केले आहेत. मी प्रतिवादीला पाठवलेली नोटीस दाखल केली आहे. मला नोटीस दाखवीली. त्यावर माझी व वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते. तसेच मी ग्रामपंचायतचा मालमत्ता क्र. २३ चा नमुना ८ चा सही शिक्याचा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते.

**सरतपास संपला**

**प्रतिवादींच्या वकिलांच्या तोंडी विनंतीनुसार साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत्ती

रेणापुर
दिनांक २३/०७/२०२५

(ज्ञा.म.गित्ते)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
रेणापुर

**नि.दि.दा.क्र. ७३/२०२३**
**निशाणी २४ लगत**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ चा उलतपास प्रतिवादीतर्फे वकिल श्री. एम.पी.पडोळे**

११. मी अशीक्षीत आहे. मला सही करता येते. माझे वडील अंदाजे विस वर्षापुर्वी मयत पावले आहेत. माझ्या वडीलांच्या नावे एक एकर जमीन व एक एकर घर जागा आहे. मला त्याचा घर क्रमांक माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोन घरजागा आहेत. साक्षीदार स्वता एक वडीलांची आहे व एक मी घेतली आहे. घर क्र. २३ हि ७० बाय ७५ घर जागा वडीलांची आहे. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र. २३ हि सर्वांच्या नावे सामाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजीपर्यंत घर क्र. २३ च्या वाटण्या झाल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, कागदोपत्री आम्हाला वडीलांनी वाटण्याकरुन दिल्या नाहीत.

१२. हे म्हणणे खरे आहे की, शेत जमीन हि वडीलांच्या नावे आहे व त्यावर आमचे नाव लागले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कागदोपत्री त्याचीसुद्धा वाटणी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व त्यातील मजकुर मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वाटण्या झाल्या नाहीत व मी सदरचे खोटे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलतपास संपला

फेरतपास नाही... श्रवणोत्तर निवेदन स्विकृत्ती

रेणापुर (ज्ञा.म.गित्ते)

दिनांक १२/०८/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

रेणापुर